# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 32/2024 दिनांक : 22.01.2024

## 1)जबरी चोरी :–

**नांदेड ग्रामीण** :–दिनांक 20.01.2024 रोजी चे 19.30 वा. चे सुमारास, **ढगे हॉस्पीटल जवळ हाडको नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्याचे घरी पायी जात असतांना यातील अज्ञात तीन आरोपीतांनी संगणमत करून खंजरचा धाक दाखवुन त्यांचे खिशातील पोको कंपणीचा मोबाईल किंमती 13,999/–रू चा बळजबरीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी मधुसुधन मुरलीधर बीडकर, वय 53 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. भिमाशंकर नगर गोपालचावडी ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 54/2024 कलम 392, 34 भादवी सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गायकवाड, मो. नं. 9057510100** हे करीत आहेत.

## 2)गंभीर दुखापत :–

**मुखेड** :–दिनांक 21.01.2024 रोजी चे सकाळी 08.30 वा. चे सुमारास, **शंकर वडजे यांचे घरासमोर रोडवर मौ. सलगरा (खु) ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व आरोपीतांना त्यांच्या शेतात जाण्या येण्याचा वाद मिटविण्यासाठी पंचानी बोलाविले असता यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून रत्याच्या कारणावरून फिर्यादीस लोखंडी पाईप व काठीने उजव्या पायाचे फेंड्रीवर, खुब्यावर मारून फॅक्चर करून गंभीर दुखापत केली व साक्षीदाराना शिवीगाळ करून लाथाबुक्याने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी राजाराम अंबाजी डांगे, वय 65 वर्षे, व्यवसाय शेती रा. सलगरा (खु) ता. मुखेड जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरन 16/2024 कलम 326, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री बोधगीरे, मो.नं. 8369695184** हे करीत आहेत.

## 3)आत्महत्येस प्रवृत्त केले :–

**उमरी** :–दिनांक 21.01.2024 रोजी चे 08.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे मुलीच्या सासरी मौ. गोरठा ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीची **मयत मुलगी नामे सुनिता संतोष हैबतकर, वय 26 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. गोरठा ता. उमरी जि. नांदेड** हिस तीचे सासरचे लोकांनी संगणमत करून अनैतीक संबधास विरोध करतेस असे म्हणुन सतत शिवीगाळ व मारहाण करीत असल्यामुळे सासरचे लोकांना कंटाळुन राहाते घरी गळफास घेवुन मरण पावली. यातील नमुद चार आरोपीतांनी तिला आत्महत्येस प्रवृत्त केले. वगैरे **फिर्यादी मरीबा पी वाघजी भेडेकर, वय 65 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. धानोरा ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरन 40/2024 कलम 306, 323, 504, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री करे, मो.नं. 7798354377** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ :–

**नायगांव** :– दिनांक 01.01.2021 ते दिनांक 24.12.2023 रोजी चे 12.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी अदनान कॉलनी धनेगाव व माहेरी विठ्ठलनगर नायगांव ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुला स्वंयपाक करता येत नाही, तु मला नाही पाहिजे, तु मला उलट बोलतेस असे बोलुन मला फ्लॅट घेण्यासाठी म्हणुन तुझे माहेरहून चार लाख रूपयाची घेवुन ये म्हणुन मागणी करून शिवीगाळ व मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 38 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगांव** गुरनं 06/2024 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/349 सांगवीकर, मो.क्रं. 7875643333** हे करीत आहेत.

## 5)अपघात :–

**कंधार** :– दि. 18.01.2024 रोजी चे 22.00 वा. चे सुमारास, फुलवळ शिवारातील टोल नाक्याजवळ ता. कंधार जि. **नांदेड येथे,** यातील **मयत नामे कामन पि. मरीबा बनसोडे, रा. फुलवळ ता. कंधार जि. नांदेड** यांनी आपले ताब्यातील ॲटो क्रमांक एमएच–26/पी–8960 हा हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन डिव्हायडरला जोराची धडक देऊन ॲटो पलटी करून स्वता गंभीर जखमी होवुन स्वताचे मरणास कारणीभुत झाला. व सोबतचे संदीप अर्जुन बनसोडे याचे गंभीर दुखापतीस कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी आरती भ्र. कामन बनसोडे, वय 21 वर्षे, व्यवसाय घरकाम व मजुरी रा. फुलवळ ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं. 21/2024 कलम 279, 337, 338, 304(अ) भादवी सह कलम 184 मोटार वा. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/548 काळे, मो.क्र. 9049565677** हे करीत आहेत.

## 6)पळवुन नेले :—

**विमानतळ :—** दिनांक 18.01.2024 रोजी चे सकाळी 10.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहाते घरून श्रीरामनगर गल्ली नं.—4 नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा **मुलगा नामे धनराज रामकिशन शिंदे, वय 17 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. श्रीरामनगर गल्ली नं—4 नांदेड** यास कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी पळवुन नेले आहे. वगैरे **फिर्यादी रामकिशन भिमराव शिंदे, वय 39 वर्षे, व्यवसाय शेती रा. श्रीरामनगर गल्ली नं—4 नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 15/2024 कलम 363 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गौंड, मो.क्र. 9922699624** हे करीत आहेत.

## 7)फसवणुक :—

**लोहा :—** दिनांक 16.01.2024 रोजी चे 08.00 वा. चे सुमारास, **नगरपालीका लोहा येथील आठवडी बैल बाजार लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून बिना परवाना बेकायदेशिररीत्या त्यांचेकडे ठेकेदार वर्क ऑर्डर नसतांनाही दुसऱ्यांच्या बुकावर स्टॅम्प मारून पावती वसुली करून बनावटीकरण करून बेकादेशीरपणे पैसे गोळा करून जनावर गाय, बकरी, बैल असे शासनाने ठरवुन दिलेल्या ई टेंडरींग दराने ठरवुन दिलेल्या दरापेक्षा जास्तीच्या पैशाची आकारणी करून फिर्यादीची व शासनाची आर्थीक फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी पांडुरंग दत्तराम कऱ्हाळे, वय 40 वर्षे व्यवसाय शेती रा. पारवा ता. पालम जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं. 16/2024 कलम 420, 465, 467, 468, 471, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री काळे, मो.नं. 9922391720** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :—

**1)कुंडलवाडी :—** दिनांक 21.01.2024 रोजी चे 11.40 वा. चे सुमारास, **सरकारी दवाखना कुंडलवाडी समोर ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा 185 बाटल्या किंमती 12,150/—रू ची व एक हिरो होंडा पॅशन प्रो मोटार सायकल किंमती 50,000/—रुपयाची असा एकुण 62,150/—रू माल माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/1876, श्री रघुवीरसिंह विठ्ठलसिंह चौहान, ने. पोस्टे कुंडलवाडी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंडलवाडी** गुरनं 08/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2821 चव्हाण, मो.नं. 9823017330** हे करीत आहेत.

**2)मुदखेड :—** दिनांक 21.01.2024 रोजी चे 16.00 वा. चे सुमारास, **देवापुर ते कामळज रोड जवळील टपरीजवळ हर्ष कंट्रक्शन प्रा. लि. कंपणी नाशिक कॅम्प देवापुर ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा 19 बाटल्या किंमती 1330/—रू चा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2366, चंद्रशेखर केरबा मुंडे, ने. पोस्टे मुदखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 04/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2271 ढाले, मो. नं. 9823035542** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड